




दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25








वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक १०० । किंमत - ४ रु संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । २५/०४/२०२६ । पाने - ६







# भोंदू गडगेने जमवली करोडोंची माया

## सोशल मिडिया टिम बनवून केले अंधश्रद्धेचे मार्केटींग


AI GENERATED IMAGE

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - केवळ दुसरी शिकलेला आणि एक साधा गवंडी असलेल्या राजेंद्र बापू गडगे या भोंदू बाबाने सोशल मिडियाचा आधार घेत अनेकांना अंधश्रद्धेत गुरफटले आणि अवघ्या पाच सहा वर्षांत करोडो रुपयांची माया जमवली. आज त्याची संगमनेरसह जिल्ह्यात जवळपास तेरा ठिकाणी शेती, जागा आढळून आल्या असून ही संपत्ती त्याने बायको, मुलांच्या नावावर घेतली आहे. त्याचा साथिदार डॉ. पुरी हा देखील गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असून त्याच्यावर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात तीन ते चार गुन्हे दाखल आहेत. तसेच सुरज शिंदे, मधुकर शिंदे यांनीही याकामी बाबाला साथ दिली. तपासात यासह अनेक धक्कादायक खुलासे समोर येत असल्याची माहिती श्रीरामपूर विभागाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी दिली.

भोंदू गडेगे पोलिस कोठडीत असल्याने पोलिसांनी त्याला पोलिसी खाक्या दाखवून मोठी माहिती बाहेर काढली. यात या भोंदूने चक्क तीन ते चार जणांची सोशल मीडिया टिम तयार केली. या टिमच्या माध्यमातून त्याने विविध मंत्र- तंत्राने गंभीर आजार बरे करतो. निपूत्रिकांना मुले देतो असे व्हिडीओ पसरून अंधश्रद्धेचा बाजार मांडला या व्हिडीओला भुलून अनेक भक्त बाबांकडे अकर्षित झाले आणि त्याने सुरू केला लुटीचा बाजार. त्याला डॉ. पुरी याने साथ दिली. या अंधश्रद्धेतून त्याने नागरीकांची फसवणूक करून कोट्यावधींची माया जमा केली. तपासात आत्तापर्यंत त्याच्या १३ मालमत्ता विविध ठिकाणी आढळून आल्या आहेत. यात संगमनेरसह नेवासा, राहाता या ठिकाणी स्थावर व जंगम मालमत्ता उभी केली. अवघे दुसरी शिक्षण झालेल्या या भोंदूने वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी एका वकीलाच्या हाताखाली काम केले. त्यानंतर नारायणगाव येथे सिमेंट टाक्या बनविण्याचे काम केले. २०१२ साली समनापूर येथे ८० गुंठे जागा घेतली आणि २०२० मध्ये या ठिकाणी मंदीर व ट्रस्ट स्थापन केले. या ट्रस्टमध्ये स्वत; व परिवारातील सदस्यांसह सात जणांचा समावेश आहे. भोंदूगिरीचा व्यवसाय वाढविण्यासाठी त्याने सोशल मिडीयाचा आधार घेतला. स्वत: युट्यूब चॅनेल सुरू करत त्याद्वारे स्वत:चेच माणसे उभे करून गंभीर आजार बरे करण्याचे व्हिडीओ प्रसारीत केले. त्यासाठी मोठी टिम रात्रंदिवस कार्यरत होती. बाबाची किर्ती संगमनेरसह जिल्ह्यात व राज्यात पसरल्यानंतर वडगावपान येथे दत्तधाम सरकारचा दरबार फुलू लागला. आणि फसवणूकीचे, लुटमारीचे मोठे केंद्र म्हणून उदायास आले. बाबाचे जवळपास विविध बँकामध्ये जवळपास १० अकाऊंट आढळून आले आहे. त्यावक मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचे पुढे आले आहे. मात्र एका चुकीमुळे व अंनिसच्या पाठपुरव्यामुळे बाबाचे पितळ उघडे पडले. आणि बाबाला जेलची हवा खावी लागली.

संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील दत्तधाम सरकार आश्रमाचा स्वयंघोषित भोंदू बाबा राजेंद्र गडगे याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. त्याला न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने त्याच्या पोलीस कोठडीत आणखी चार दिवसांची वाढ केली आहे.

दरम्यान राजेंद्र गडगे याच्यावर आता केवळ फसवणुकीचेच नव्हे, तर पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गतही गंभीर गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. एकूणच बाबाचे पाय आणखी खोलात रूतले आहे.

# मंत्र्यांना गेट आऊट म्हणणाऱ्या महिलेची गुणरत्न सदावर्तेंच्या मुलीने केली तक्रार




मुंबई (वृत्तसंस्था)

महिला आरक्षणाच्या मोर्चात मंत्री गिरीश महाजन यांना गेट आऊट फ्रॉम हिअर म्हणत धारेवर धरणाऱ्या महिलेविरोधात आता वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या मुलीने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. सदर महिला आपल्या मर्सिडिजमधून उतरून मोर्चात व्यत्यय आणत होती. मोर्चेकऱ्यांना असभ्य भाषेत बोलत होती. अवमानकारक शब्दांचा वापर करत होती, असे सदावर्ते यांच्या मुलीने आपल्या तक्रारीत म्हटले आहे.

लोकसभेत महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर झाल्यानंतर भाजपने सोमवारी मुंबईत एका मोर्चाचे आयोजन केले होते. यावेळी मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या कोंडीमुळे त्रस्त झालेल्या एका महिलेने मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर जाऊन आपला संताप व्यक्त केला. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या पार्श्वभूमीवर गुणरत्न सदावर्ते यांच्या कन्या झेन सदावर्ते यांनी सदर महिलेविरोधात मुंबईतील वरळी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आपल्या तक्रारीत झेन यांनी सदर महिलेवर मोर्चेकऱ्यांशी असभ्य वर्तन केल्याचा आरोप केला आहे.

झेन सदावर्ते पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाल्या, सदर महिला आपल्या मर्सिडीजमधून उतरून मोर्चात व्यत्यय आणत होती. मोर्चेकऱ्यांना असभ्य बोलत होती. शट अप, डोन्ट टॉक टू मी, गेट आऊट सारख्या अवमानकारक शब्दांचा वापर करत होती. त्यामुळे मी याविषयी वरळी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तसेच पोलिसांना सदर महिलेविरोधात कठोर कारवाई करण्याची विनंतीही केली आहे. झेन यांच्या या तक्रारीनंतर वरळी पोलिस सदर महिलेविरोधात कोणती कारवाई करतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.दुसरीकडे, ही स्थिती अत्यंत संयमाने हाताळणाऱ्या मंत्री गिरीश महाजन यांनी सदर महिलेने वाहतूक कोंडीमुळे संताप व्यक्त करत या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

# गॅस टंचाईचा हॉटेल व्यवसायावर घाला

## दरवाढीने ग्राहक हैराण; व्यावसायिकांची आर्थिक कोंडी



युवावार्ता (वृत्तसंस्था)

आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढत असलेल्या इराण-अमेरिका तणावाचे पडसाद आता थेट संगमनेरच्या स्थानिक बाजारपेठेत उमटू लागले आहेत. होर्मुझ सामुद्रधुनीतील पुरवठा अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाई निर्माण झाली असून त्याचा थेट परिणाम एलपीजी गॅस पुरवठ्यावर झाला आहे. परिणामी शहरातील हॉटेल, खानावळ आणि खाद्य व्यवसाय अक्षरशः अडचणीत सापडला आहे.

व्यावसायिक गॅस सिलिंडर वेळेवर मिळत नसल्याने अनेक हॉटेल चालकांना पर्यायी उपायांचा आधार घ्यावा लागत आहे. काहींनी घरगुती गॅसचा वापर सुरू केला होता; मात्र आता त्याचाही तुटवडा जाणवू लागल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. अनेक ठिकाणी किचन बंद ठेवण्याची वेळ आली असून काही व्यावसायिक काळ्या बाजारातून महागड्या दरात गॅस सिलिंडर खरेदी करून व्यवसाय चालवत आहेत.

या वाढलेल्या खर्चाचा थेट परिणाम ग्राहकांवर होत आहे. रोजच्या वापरातील पदार्थांच्या किमतीत वाढ झाली असून तीस रुपयांची भेळ आता पस्तीस रुपयांवर पोहोचली आहे. चहा, नाश्ता आणि इतर खाद्यपदार्थांच्या दरातही वाढ झाली आहे. दरवाढीमुळे ग्राहकसंख्या घटत असून व्यवसायाचा वेग मंदावला आहे.

हॉटेल व्यवसायिकांवर आधीच इमारत भाडे, बँक कर्जाचे हप्ते, वीजबिल, बाजार खर्च आणि कर्मचाऱ्यांचे पगार यांचा मोठा आर्थिक ताण आहे. अशातच गॅस टंचाईमुळे उत्पन्न घटल्याने त्यांची आर्थिक कोंडी अधिकच वाढली आहे. दररोजचा खर्च भागवणे कठीण झाले आहे. व्यवसाय बंद ठेवला तर ग्राहक तुटतील, आणि सुरू ठेवला तर तोटाच सहन करावा लागतो, अशी व्यथा अनेक हॉटेल चालकांनी व्यक्त केली. काही ठिकाणी पर्यायी इंधनाचा वापर करण्याचा प्रयत्न सुरू असला, तरी त्याचा खर्च परवडणारा नसल्याचे व्यावसायिक सांगतात. त्यामुळे लघु व मध्यम व्यावसायिकांसमोर अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे पुरवठा साखळीवर परिणाम होणे अपेक्षित असले तरी स्थानिक पातळीवर त्याचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना होणे गरजेचे आहे. गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी आणि छोट्या व्यावसायिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी काम करणार- रहाणे

## मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे यांचा सेवापूर्ती सोहळा




युवावार्ता (प्रतिनिधी)-

संगमनेर - आता पुढे विद्यार्थ्यांसाठी काम करून त्यांना घडवायचे आहे. पैसा किती कमवायचा आणि त्याचा योग्य उपयोग कसा करायचा याचे ज्ञानही विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. वर्गातील मागच्या बाकावर बसणारा विद्यार्थी देखील हुशार झाला पाहिजे, यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे यांनी केले.


संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी येथील चंदनेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेले राजेंद्र राहाणे यांच्या सेवापूर्तीनिमित्त जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर पद्मश्री राहीबाई पोपरे, आदर्श सरपंच भास्कर पेरे, संस्थेचे अध्यक्ष आनंदराव कढणे, रजिस्ट्रार एम. एम. फटांगरे, आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. रहाणे पुढे म्हणाले, ज्या शाळेतून आपण शिक्षण घेतले, त्या शाळेचा विकास होणे ही आपली जबाबदारी आहे. शाळेसाठी जेवढे शक्य होते तेवढे योगदान दिले. अधिकाऱ्याचा गर्व कधीच बाळगला नाही; सर्वसामान्य कार्यकर्त्याप्रमाणे काम केले. आता विद्यार्थ्यांच्या घडणीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. विद्यार्थी हीच देशाची खरी संपत्ती आहे.

पद्मश्री राहिबाई पोपरे म्हणाल्या, मला मिळालेले पुरस्कार माझे नसून मातीतल्या कष्टाचे आहेत, रहाणे यांनी सेवानिवृत्तीनंतरही समाजासाठी कार्य सुरू ठेवावे. भास्कर पेरे म्हणाले, राहाणे यांच्यासारखी माणसे प्रशासनात आहेत, ही अभिमानाची बाब आहे. त्यांनी विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहून काम केले, तर भविष्यात अनेक विद्यार्थी उच्च पदांवर पोहोचतील. मेहनतीने काहीही अशक्य नाही. विद्यार्थ्यांचा देव अभ्यासात आहे, त्यामुळे भरपूर अभ्यास करा आणि मोठे व्हा. तसेच निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी झाडे लावा, असा सल्लाही त्यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. डुबे व श्री. गोसावी यांनी केले.










संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com





संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)– शिर्डी लोकसभा मतदारसंघ संपर्क प्रमुखपदी निवड झाल्यानंतर खा. ज्योती वाघमारे यांनी संगमनेरला भेट दिली. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख रमेश काळे यांनी त्यांचा सत्कार केला. या प्रसंगी आमदार अमोल खताळ, माजी खासदार सदाशिव लोखंडे उपस्थित होते.


# संगमनेर ध्रुवच्या विद्यार्थिनींची राष्ट्रीय मोहोर

## दोघींना 'नृत्यकला भूषण बाल पुरस्कार' जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - केवळ शैक्षणिक गुणवत्तेतच नव्हे, तर कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रातही आपल्या नावाचा दबदबा निर्माण करणाऱ्या संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक आणि सांस्कृतिक उंची सिद्ध केली आहे. शाळेच्या दोन प्रतिभावान विद्यार्थिनी यशोधरा लक्ष्मीकांत नाईकवाडी आणि आराध्या जनार्दन पुजारी यांनी नृत्य क्षेत्रात अभूतपूर्व यश संपादन करत प्रतिष्ठेचा 'नृत्यकला भूषण बाल पुरस्कार २०२६' आपल्या नावे केला आहे. या दैदिप्यमान यशामुळे ध्रुव ग्लोबल स्कूलचा डंका आता राष्ट्रीय स्तरावर घुमू लागला आहे.

'कल्चरल फाऊंडेशन ऑफ इंडिया'तर्फे दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या या राष्ट्रीय पुरस्कारासाठी देशभरातील हजारो विद्यार्थी आपले नशीब आजमावत असतात. अत्यंत कठीण आणि शिस्तबद्ध निवड प्रक्रियेतून अंतिम यादीत ध्रुव ग्लोबल स्कूलच्या या दोन विद्यार्थिनींनी आपले स्थान निश्चित केले. विशेष म्हणजे, यशोधरा आणि आराध्या यांनी भारतीय शास्त्रीय नृत्यातील 'ओडिसी' या कठीण नृत्यशैलीचे उत्कृष्ट सादरीकरण करत परीक्षकांची मने जिंकली. त्यांच्या अंगातील लय, ताल आणि मुद्राभिनयाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.





कोणतेही यश हे सहजासहजी मिळत नसते, हे या विद्यार्थिनींनी आपल्या परिश्रमातून सिद्ध केले. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरु असलेला अखंड सराव, तासनतास चालणारे परिश्रम आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली केलेली कठोर साधना यांच्या बळावरच त्यांनी हे यश खेचून आणले आहे. या यशात शाळेच्या नृत्य प्रशिक्षिका सोनाली महापात्रा आणि गंधर्व पलाई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या पुरस्कारांचे वितरण येत्या २६ एप्रिल २०२६ रोजी नागपूर येथे पार पडणार आहे. कला क्षेत्रातील दिग्गज आणि अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत या सर्व कलाकारांना सन्मानित केले जाईल.

या राष्ट्रीय यशाच्या निमित्ताने शाळेचे चेअरमन डॉ. संजय मालपाणी, व्हा. चेअरमन गिरीश मालपाणी, प्राचार्य अर्चना घोरपडे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसते तर त्यांना कलेची जोड मिळणे आवश्यक आहे. ध्रुव ग्लोबल स्कूल याच विचाराने नेहमीच कार्यक्षम राहील, अशा भावना प्राचार्यांनी व्यक्त केल्या आहेत. संगमनेर आणि अकोले परिसरातील शैक्षणिक आणि सांस्कृतिक वर्तुळातून या दोन्ही विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. योग्य मार्गदर्शन आणि जिद्द असेल तर ग्रामीण भागातील मुलेही राष्ट्रीय स्तरावर स्वतःचे नाव कोरू शकतात हेच या यशातून सिद्ध झाले आहे.

# जिल्ह्यात वादळी पावसाचा 'येलो अलर्ट', नागरिकांनी सतर्क राहावे



अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)- भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार जिल्ह्यात दि. २४ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना, वीज चमकत असताना अथवा वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली किंवा झाडाजवळ उभे राहू नये, तसेच वीजवाहक तारांपासून सुरक्षित अंतर राखावे. घराबाहेर पडताना इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर टाळावा व लोखंडी वस्तूंशी संपर्क टाळावा.

मोकळ्या मैदानात, शेतात किंवा उंच ठिकाणी उभे राहणे टाळावे. विजेच्या खांब, ट्रान्सफॉर्मर, टॉवर, धातूचे कुंपण यापासून दूर राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसेच घरावरील सैल पत्रे (होर्डिंग), झाडांच्या फांद्या यांची पडझड होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात.

वीज कडकडाटाच्या वेळी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. जमिनीवर बसताना गुडघे वाकवून डोके खाली ठेवावे आणि शक्यतो जमिनीशी थेट संपर्क कमी ठेवावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

धरण, नदी, नाले परिसरात जाणाऱ्या नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. पाण्याच्या प्रवाहात उतरू नये, तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी घेणे टाळावे. शेतकऱ्यांनी पिकांचे संरक्षण करण्यासाठी वेळेवर नियोजन करावे.

जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. वादळी वाऱ्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतमाल सुरक्षित ठेवावा.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी तात्काळ स्थानिक प्रशासन, पोलीस ठाणे किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहिल्यानगर येथे दूरध्वनी क्रमांक १०७७, ०२४१-२३५६९४० व २३२३८४४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# संगमनेर महाविद्यालयास उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार जाहीर



संगमनेर ()- शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अहिल्यानगर विभागातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार' पुन्हा एकदा पटकावून महाविद्यालयाने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. विशेष म्हणजे, हा बहुमान महाविद्यालयाला आतापर्यंत पाच वेळा प्राप्त झाला आहे.

पत्रकात म्हटले, की संगमनेर महाविद्यालयाने यावर्षी आंतरमहाविद्यालयीन स्तरापासून ते थेट 'खेलो इंडिया'पर्यंत यशाची पताका फडकवली आहे. तसेच आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत ३१० खेळाडूंनी सहभाग घेत, २०० हून अधिक सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके जिंकली आहेत. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत महाविद्यालयाच्या १४ खेळाडूंनी प्रतिनिधित्व करत, ४ सुवर्ण आणि १ रौप्य पदक पटकावून देशात गौरव मिळवला. राष्ट्रीय स्पर्धेत ७ खेळाडूंनी सहभाग नोंदवून २ सुवर्ण पदके, तर राज्यस्तरावर ३ सुवर्ण व ३ कांस्य पदके पटकावली आहेत. महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या खेळाडूंनी एक सुवर्ण व एक ब्राँझ पदक पटकावले आहे. केवळ क्रीडा स्पर्धांमध्येच नव्हे, तर आयोजनातही महाविद्यालयाने आघाडी घेतली आहे. महाराष्ट्र राज्यस्तरीय १७ वर्षांखालील शालेय कबड्डी स्पर्धा आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविभागीय एक तसेच पाच आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे यशस्वी आयोजन यावर्षी करण्यात आले.

या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सचिव अनिल राठी, जनरल सेक्रेटरी नारायण कलंत्री, क्रीडा संवर्धन समितीमधील अनिल सातपुते, नरेंद्र चांडक, रविंद्र पवार, संदीप चोथवे, संतोष करवा, जसपाल डंग, संस्थेचे सीईओ डॉ. राजेंद्र लड्ढा, प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य डॉ. रवींद्र तासीलदार, उपप्राचार्य डॉ. प्रवीण त्र्यंबके आदींनी सर्व खेळाडूंचे व क्रीडा विभागाचे कौतुक केले आहे.

# अकोले हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त मोफत आरोग्य शिबिर व अत्याधुनिक सुविधांचे उद्‌घाटन



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- डॉ. प्रकाश वाकचौरे यांचे अकोले हॉस्पिटल येथे तिसरा वर्धापन दिनानिमित्त मोफत आरोग्य शिबिर व मॉड्युलर ऑपरेशन थिएटर व आधुनिक उपकरणे यांचे उद्घाटन व शासकीय योजनांचे अनावरण आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते पार पडले. तसेच बांधकाम कामगार शिबिर, आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचे उद्घाटन सोनाली नाईकवाडी (नगरसेविका, अकोले नगरपंचायत) यांच्या हस्ते पार पडले.


यावेळी तज्ञ डॉ. तुषार राहणे (स्त्री रोग तज्ञ व लॅप्रोस्कोपिक सर्जन), डॉ. अद्वैत देशपांडे, डॉ. तुषार गावडे, डॉ. प्रतिक घोडके, डॉ. गणेश नवले, डॉ. हर्षदा बंगाळ, डॉ. शिवाजी वैद्य, ड. सोनाली येवले, कल्पना फापाळे, नयना घोडके, पुष्पा वामन, शीला नाईकवाडी, वसुधा गव्हाणे, ललिता वाकचौरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी अकोले मेडिकल फाउंडेशनच्या सचिव रूपाली वाकचौरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी हॉस्पिटलच्या विविध योजनांचे अनावरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री सहायता निधी, इमारत बांधकाम कामगार, एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, तसेच मॉड्युलर ऑपरेशन थिएटर व अत्याधुनिक उपकरणे यांचे अनावरण करण्यात आले.

आरोग्य शिबिरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये महिलांनी सहभाग घेतला असून, आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. तसेच रक्तदान शिबिरामध्ये भाग घेतला. अकोले मेडिकल फाउंडेशनच्या वतीने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

# 'शिवाजी कोण होता' पुस्तक पाच लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून प्रत्युत्तर देणार

## आ. गायकवाड यांना छात्र भारतीचे आव्हान




संगमनेर

कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता' या पुस्तकावर बुलढाणा येथील शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी आक्षेप घेत, प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून शिवीगाळ केली व धमकी दिली. मात्र, छात्रभारती विद्यार्थी संघटना हे पुस्तक राज्यात पाच लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून गायकवाड यांना प्रत्युत्तर देणार आहे, अशी माहिती छात्रभारती विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिकेत घुले यांनी दिली.

आमदार गायकवाड यांनी प्रकाशक आंबी यांना कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या पुस्तकावरून धमकी दिली, शिवीगाळ केली. या पार्श्वभूमीवर घुले यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यांनी गुरुवारी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी खरे छत्रपती हे पुस्तक अत्यंत मार्मिक आणि शिवाजी महाराजांचे काम व त्यांची दृष्टी समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

शिवाजी महाराज सांगितले आहेत. हे पुस्तक अत्यंत मार्मिक आणि शिवाजी महाराजांचे काम व त्यांची दृष्टी समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. पुस्तक न वाचता राजकीय स्टंट करणाऱ्या संजय गायकवाड यांना छात्र भारतीने आव्हान दिले आहे. सदरचे पुस्तक महाराष्ट्रातल्या पाच लाख विद्यार्थ्यांना आम्ही वाटप करून खरे शिवाजी महाराज घराघरांत पोहोचवणार आहोत. आपण सरकारमधील आमदार आहात, सरकार आपले आहे.

आपण न्यायालयात जावे. हिंमत असेल, तर न्यायालयातून पुस्तकावर बंदी आणावी. शक्य झाल्यास कधी तरी पुस्तक वाचावे, असे आव्हानही घुले यांनी दिले आहे. प्रा. डॉ. मृणालिनी आहेर यांच्या प्रकरणात न्यायालयाने दिलेला निकाल हा अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी आणि विशेषतः 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या संदर्भासाठी अत्यंत ऐतिहासिक ठरला आहे, असेही घुले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SUNITA BABASAHEB BIBWE
TO NEW NAME AS
SUNITA BABASAHEB BIBAVE
BY AFFIDAVIT NO - 431/2026
DATE 22/04/2026
ADD- DHRUV ACADAMY, JAVAL, KATWAN MALA, DHANDARPHAL BK. TAL - SANGAMNER, DIST - AHILYANAGAR, MAHARASHTRA

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
PRATIK BABASAHEB BIBWE
TO NEW NAME AS
PRATIK BABASAHEB BIBAVE
BY AFFIDAVIT NO - 430/2026
DATE 22/04/2026
ADD- DHRUV ACADAMY, JAVAL, KATWAN MALA, DHANDARPHAL BK. TAL.SANGAMNER, DIST - AHILYANAGAR, MAHARASHTRA

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SANJAYRAO DESHMUKH
TO NEW NAME AS
SANJAY DESHMUKH
BY AFFIDAVIT NO 390/2026
DATE 06/04/2026
ADD- VIDHUT NAGAR, V M V AMRAVATI POST. AMRAVATI, MAHARASHTRA

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
UJWALABAI DESHMUKH
TO NEW NAME AS
UJWALA DESHMUKH
BY AFFIDAVIT NO 391/2026
DATE 06/04/2026
ADD- VIDHUT NAGAR, V M V AMRAVATI POST. AMRAVATI, MAHARASHTRA

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SANGRAM SANJAYRAO DESHMUKH
TO NEW NAME AS
SANGRAM SANJAY DESHMUKH
BY AFFIDAVIT NO 389/2026
DATE 06/04/2026
ADD- VIDHUT NAGAR, V M V AMRAVATI POST. AMRAVATI, MAHARASHTRA

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
NARESHKUMARI SHRICHAND BATRA
TO NEW NAME AS
NARESH PRAVIN SACHDEV
BY AFFIDAVIT NO - 428/2026
DATE 22/04/2026
ADD- NEAR SHANTINATH CHITRAMANDIR, PRAVARANAGAR, LONI KHURD,TAL - RAHATA, DIST - AHMEDNAGAR, MAHARASHTRA

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
PRAVINKUMAR PISHORILAL SACHDEO
TO NEW NAME AS
PRAVIN PISHORILAL SACHDEO
BY AFFIDAVIT NO - 429/2026
DATE 22/04/2026
ADD- ADD-172, DUKANE LINE, FACTORY AREA, PRAVARANAGAR, LONI KHURD,TAL - RAHATA, DIST - AHMEDNAGAR, MAHARASHTRA

# संपादकीय...

## ऊर्जा संकटात भारताची भूमिका ठळक

पश्चिम आशियातील तणाव पुन्हा एकदा जागतिक पातळीवर परिणाम घडवून आणतो, हे अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर स्पष्ट झाले आहे. फेब्रुवारीच्या अखेरीस वॉशिंग्टन आणि तेहरान यांच्यात सुरू झालेल्या हल्ले आणि प्रतिहल्ल्यांनी अल्पावधीतच व्यापक धोरणात्मक संकटाचे रूप घेतले. विशेषतः होर्मूझ सामुद्रधुनीतील अडथळ्यांमुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली आणि त्याचे तात्काळ परिणाम दक्षिण आशियासारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांवर जाणवले. या संकटामुळे प्रादेशिक अर्थव्यवस्थांवर मोठा ताण निर्माण झाला. बांगलादेश, श्रीलंका आणि पाकिस्तानसारख्या देशांना इंधनटंचाईचा सामना करावा लागला. कच्चे तेल, एलपीजी आणि इतर पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्याने अनेक देशांनी इंधनाचे रेशनिंग सुरू केले, तर काही ठिकाणी उद्योगांवर परिणाम होऊन उत्पादन घटले. कामाचे तास कमी करणे किंवा घरून काम करण्यासारखे उपाय अवलंबावे लागले. या सर्व घटनांमधून त्या देशांच्या ऊर्जा अवलंबित्वातील मर्यादा स्पष्टपणे पुढे आल्या. याच्या तुलनेत भारताने तुलनेने अधिक स्थिरता दाखवली. भारताची ऊर्जा धोरणे केवळ तात्कालिक नव्हती, तर दीर्घकालीन नियोजनावर आधारित होती. कच्च्या तेलाच्या आयातीसाठी भारत अजूनही खाडी प्रदेशावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असला, तरी आयात स्रोतांचे विविधीकरण केल्यामुळे संकटाचा परिणाम काही प्रमाणात नियंत्रित राहिला. देशाने रशिया, अमेरिका आणि इतर देशांकडूनही आयात वाढवून ऊर्जा सुरक्षेचा पर्याय मजबूत ठेवला आहे. भारताची शुद्धीकरण क्षमता हा या संपूर्ण परिस्थितीतील महत्त्वाचा घटक ठरला. देशातील रिफायनऱ्या उच्च क्षमतेने कार्यरत असल्यामुळे कच्च्या तेलाचे रूपांतर करून पेट्रोलियम उत्पादनांचा पुरवठा केवळ देशांतर्गतच नव्हे, तर शेजारी राष्ट्रांनाही करता आला. यामुळे भारताने स्वतःच्या गरजा भागवताना प्रादेशिक पातळीवर मदतीचा हात पुढे केला. विशेषतः नेबरहूड फर्स्ट या धोरणाचा परिणाम या काळात प्रकर्षाने दिसून आला. बांगलादेशला भारत-बांगलादेश मैत्री पाइपलाइनद्वारे डिझेल पुरवठा करण्यात आला. मार्चच्या अखेरीस हजारो टन इंधन पुरवून भारताने त्या देशातील तातडीच्या संकटाला काही प्रमाणात दिलासा दिला. याच काळात उच्चस्तरीय राजनैतिक संवादही सुरू राहिला, ज्यामुळे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ झाले. श्रीलंकेच्या बाबतीतही भारताची भूमिका महत्त्वाची ठरली. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या या देशाला भारताने मोठ्या प्रमाणावर पेट्रोलियम उत्पादने पुरवून मदत केली. या सहाय्यामुळे श्रीलंकेतील तातडीच्या गरजांची पूर्तता झाली, जरी त्या देशाला इंधनाचे रेशनिंग आणि किमती वाढवण्याचे कठोर निर्णय घ्यावे लागले. नेपाळ आणि भूतान या देशांमध्ये भारताचा पुरवठा तुलनेने स्थिर राहिला. भारतीय तेल निगममार्फत नियमित इंधन पुरवठा सुरू ठेवण्यात आला. या देशांनी काही खबरदारीचे उपाय अवलंबले असले, तरी भारताच्या सातत्यपूर्ण पुरवठ्यामुळे मोठे संकट टळले. मालदीवनेही ऊर्जा सहकार्याबाबत भारताशी संपर्क साधला असून, त्यातून भारताची विश्वासार्हता अधोरेखित होते. या सर्व घडामोडींमधून एक महत्त्वाची बाब समोर येते, ती म्हणजे ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण किती आवश्यक आहे. खाडी प्रदेशावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेले देश या संकटात अधिक अडचणीत आले, तर विविध स्रोतांचा अवलंब केलेल्या भारताने तुलनेने अधिक स्थिरता राखली. यामुळे भारताची धोरणात्मक स्वायत्तता अधिक बळकट झाल्याचे दिसते. तथापि, या परिस्थितीत आत्मसंतुष्ट राहणे भारतासाठी धोकादायक ठरू शकते. ऊर्जा सुरक्षेसाठी अजूनही अनेक पावले उचलण्याची गरज आहे. अणुऊर्जा, एलपीजी पुरवठा, कोळसा वायूकरण आणि नवीकरणीय ऊर्जेच्या क्षेत्रात अधिक गुंतवणूक करून दीर्घकालीन स्थिरता साधणे आवश्यक आहे. तसेच जागतिक भागीदारी मजबूत करणेही तितकेच महत्त्वाचे ठरते. एकूणच, या संकटातून भारताच्या प्रादेशिक नेतृत्वाची झलक दिसून येते. भारताने केवळ स्वतःच्या गरजा भागवल्या नाहीत, तर शेजारी देशांच्या मदतीसाठी पुढे येत जबाबदार भूमिका बजावली.

# तेलंगणाच्या पोलीस महासंचालकपदी महेश भागवत

## अहिल्यानगरच्या सुपूत्रामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा आणखी तुरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्याचे सुपुत्र व आयपीएस अधिकारी महेश भागवत यांची तेलंगणा राज्यात पोलीस महासंचालक (कायदा आणि सुव्यवस्था) पदी निवड झाली आहे. भागवत यांच्या निवडीने अहिल्यानगर जिल्ह्याच्या मानाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

भागवत हे १९९५ बॅचचे आयपीएस अधिकारी असून सध्या ते तेलंगणा राज्यात कायदा व विभागाचे अतिरिक्त सुव्यवस्था पोलीस महासंचालक या पदावर कार्यरत होते. तर त्यापूर्वी साडेसहा वर्ष तर हैद्राबादच्ये शिवार प्रांतातील राचकोंडा पोलिस आयुक्तांलयाचे प्रथम पोलीस आयुक्त म्हणूनही कार्यरत होते. भागवत यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण पाथर्डी येथे तर पुढील शिक्षण पुणे येथे झाले आहे. आजपर्यंतच्या सेवेत त्यांनी नक्षलवाद्याच्या विरोधात कारवाई केली आहे, तर व्हाईट कॉलर गुन्हेगारी नियंत्रणात आणणे, संघटित अंमली पदार्थ विक्रेत्यांवर कारवाई करणे, मानवी तस्करीला आळा घालणे, पीडितांना लैंगिक तस्करीच्या जाळ्यात अडकून न देणे, राज्य, देश व परदेशात तस्करांवर खटला चालवणे अशा मोहिमेत सहभाग घेतला आहे. देशाच्या गृहमंत्रालयाने प्रकशित केलेल्या मानवी तस्करीवरील आठ पुस्तकांमध्ये भागवत यांचे योगदान आहे. हैद्राबाद येथील राष्ट्रीय पोलीस प्रशिक्षण अकादमी, मसुरी येथील आयएएस प्रशिक्षण अकादमी, एलबीएसएनएए व इतर अनेक राज्यात त्यांना व्याख्याते म्हणून बोलवले जाते. गेल्या दहा वर्षात झालेल्या स्पर्धा परीक्षेत त्यांनी मार्गदर्शन केलेले दोन हजार तीनशे अधिकारी देशसेवेत रुजू झाले आहेत.

### भागवत यांना मिळालेली पदके



राष्ट्रपती शौर्य पदक २००४, राष्ट्रपती पोलीस गुणवत्तापूर्ण सेवा पदक २०११, राष्ट्रपती पोलीस विशेष सेवा पदक २०२२, मणिपूर पोलीस विशेष कर्तव्य पदक, आंध्रप्रदेश पोलीस अंतर्गत सुरक्षा पदक, केंद्रीय गृहमंत्री प्रशंसापत्र, भागवत यांना मिळालेले पुरस्कार अमेरिकेच्या इंटर नॅशनल असोशिएन ऑफ पोलीसकडून पोलिसिंग पुरस्कार, अमेरिका परराष्ट्र विभागाचा ट्रफेकिंग इन पर्सन रिपोर्ट पुरस्कार, कॅनडा येथील मानवी तस्करी विरोधी कार्य करणाऱ्या जगातील शंभर नेत्यांच्या यादीत कर भागवत यांचे नाव, भागवत यांनी सुरु केलेल्या वर्क साईट स्कुल प्रकल्पासाठी यूएसएच्या आयएसीपी कडून मानवाधिकार पुरस्कार, स्मार्ट पोलिसिंग पुरस्कार यांचा समावेश आहे.

# अघोरी प्रथांवर आळा घालण्यासाठी दोन महिन्यांत 'दक्षता अधिकारी' नेमा, उच्च न्यायालयाचे राज्याला निर्देश

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)-

समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी व अमानुष, अघोरी व जादूटोणा प्रथा नष्ट करण्यासाठी राज्यात २०१३ चा कायदा लागू आहे. मात्र, आजही अशा घटना घडत असल्याने, या कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २ महिन्यात राज्यभरात 'दक्षता अधिकाऱ्यांच्या' (व्हिजिलन्स ऑफिसर) नियुक्त्या करा. तसेच नवीन कायद्यांतर्गत 'नियम' तयार करा, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्या. विभा कंकणवाडी आणि न्या. निरज धोटे यांनी १८ एप्रिल २०२६ रोजी राज्य शासनास दिले आहेत.

छत्रपती संभाजीनगर लगतच्या शेंद्रा येथील मांगीरबाबाच्या यात्रेत देवाच्या साक्षीने पाठीत लोखंडी गळ टोचून नवस फेडण्याची अघोरी प्रथा बंद करण्याची विनंती करणारी जनहित याचिका कॉ. गणपत भिसे यांनी ड. अंगद कानडे यांच्यामार्फत लाल सेना संघटनेच्यावतीने दाखल करण्यात आली होती.

या जनहित याचिकेच्या अनुषंगाने वरील अघोरी प्रथा कायद्याने बंद करण्यात आल्याचा निवाडा खंडपीठाने २०१९ ला दिला होता. परंतु, याची अंमलबजावणी कोणती यंत्रणा, कशी करील, यासंदर्भात निर्णय झाला नव्हता. विद्यमान खंडपीठाने वरीलप्रमाणे आदेश देऊन अंमलबजावणीचा प्रश्न सोडविला आहे.

वरील कायद्याच्या कलम ५ नुसार, राज्य सरकार अधिसूचनेद्वारे किमान पोलिस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करू शकते. कायद्याचा भंग झाल्यास त्यासंदर्भातील पुरावे गोळा करणे, पोलिस ठाण्यांना मदत करणे, ही त्यांची कर्तव्ये असून, यात अडथळा आणणाऱ्याला ३ महिने कारावास किंवा ५ हजार रुपये दंड किंवा दोन्ही, अशी या कायद्यात तरतूद आहे. मात्र, राज्याने अद्याप अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याचे शपथपत्र दाखल केलेले नाही.

चिकलठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक नंदकिशोर अंतरप यांनी पोलिसांनी केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. २०१८ ला मांगीरबाबा यात्रेदरम्यान लोखंडी हुक शरीरात खुपसण्याची अमानुष प्रथा थांबवण्यासाठी ट्रस्टला नोटीस दिली. तसेच बॅनर, पत्रके, ग्रामसभांद्वारे जनजागृती केली.

२६ एप्रिल २०१९ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार ही प्रथा थांबविण्यात आली आहे. २०१३ च्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

# जिजामाता स्कूलमध्ये 'इंग्लिश स्किट कॉम्पिटिशन' उत्साहात

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये 'इंटरहाऊस इंग्लिश स्किट कॉम्पिटिशन' मोठ्या उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व वाढवणे आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करणे या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




स्पर्धेत इयत्ता सहावी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व प्रेरणादायी विषयांवर आधारित स्किट्स सादर करून सर्वांची मने जिंकली. 'सेव्ह एन्व्हायर्नमेंट', 'इम्पॉर्टन्स ऑफ एज्युकेशन', 'अ डे विथआउट टेक्नॉलॉजी' यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले. त्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या हाऊसच्या शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

विद्यार्थ्यांनी संवादफेक, अभिनय, वेशभूषा आणि सादरीकरण यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या कौशल्याची झलक दाखवली.

या स्पर्धेचे प्राचार्या जिज्ञासा कुलकर्णी व समन्वयक संदीप आभाळे यांनी परीक्षण केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या अभिनय, विषय निवड, उच्चार, आत्मविश्वास आणि एकूण सादरीकरण यांचे बारकाईने परीक्षण करून विजेत्यांची निवड केली.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक करत, असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. तसेच स्किट सादर करताना हावभाव, उच्चार, संवाद यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संपूर्ण उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला. सहशिक्षिका राजेश्वरी गुंजाळ आणि दिपाली फटांगरे यांनी स्पर्धेचे सूत्रसंचालन केले.


We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५


युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक, अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

We Are Hiring SANGAMNER
Marketing Team
SLH Tax Advisors Pvt Ltd
Marketing Manager - 1 (25k to 50k+ Incentive)
Marketing Executive - 5 (20k to 35k + Incentive)
Digital Marketing - 1 (15k to 25k + Incentive)
Telecaller (Female) - 1 (15k to 20k + Incentive)
Salary + Incentives
Fast Growth Opportunity
Address - SLH Advisors Pvt Led, Saish Business Park,Behind Joshi Palace, Sangamner
Call/WhatsApp- 7264804000





पाहिजेत
मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)
फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)
रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी
सप्तश्रृंगी हॉस्पिटल अ‍ॅण्ड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते-वाघापूर, ता. संगमनेर, जि- अहिल्यानगर
9657230023

पाहिजेत
श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स, दिल्ली नाका संगमनेर या फर्मसाठी
अकाउंटंट - १ जागा (बी. कॉम/ टॅली)- पुरुष
सेल्समन - १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)
पगार - १४०००+ इन्सेंटिव्ह
बी.बी.ए./ एम.बी.ए. प्राधान्य
8999862759

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141


हेल्पर पाहिजे
साईकृपा एंटरप्राईजेस
कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME BABASAHEB APPAJI BIBWE
TO NEW NAME AS BABASAHEB APPAJI BIBAVE
BY AFFIDAVIT NO - 432/2026 DATE 22/04/2026
ADD- DHRUV ACADAMY, JAVAL, KATWAN MALA, DHANDARPHAL BK. TAL - SANGAMNER, DIST - AHILYANAGAR, MAHARASHTRA

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९ ७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी











# विधान परिषद निवडणुकीसाठी भाजप संभाव्य उमेदवारांची यादी तयार



मुंबई (प्रतिनिधी)-

विधान परिषदेच्या जागांसाठी भाजपकडून जोरदार हालचाली सुरू आहेत. भाजपकडून ३० जणांच्या नावाची यादी केंद्रीय नेतृत्वाला पाठवल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी संघटनेत काम करणाऱ्या आणि नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत निर्णय झाल्याची माहिती आहे. यापैकी प्रज्ञा सातव यांच्या नावावर जवळपास शिक्कामोर्तब झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

भाजपने केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवलेल्या ३० जणांच्या यादीमध्ये प्रज्ञा सातव यांच्यासह माधवी नाईक, डॉ. उपेंद्र कोठेकर, मनोज कोटक, केशव उपाध्ये, रवी अनासपुरे, राजेश पांडे, दयाशंकर तिवारी, राम सातपुते, रणजितसिंह निंबाळकर, संजय काका पाटील, विवेक कोल्हे, जगदीश मुळीक, प्रमोद जठार, संजय केणेकर, अर्चना पाटील चाकूरकर, दादाराव केचे, संजय भेंडे, संदीप जोशी यांची नावं असल्याची माहिती आहे. या पैकी आता कुणाच्या नावावर शिक्कामोर्तब होतोय, ते पाहणे महत्त्वाचे राहील.

विधान परिषदेच्या निवडणुकीत भाजपच्या वाट्याला असलेल्या ६ जागांसाठी कुणाला संधी द्यायची, यावर लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी संघटनेतील जुन्या कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार असल्याची माहिती आहे. ३० जणांची यादी तयार आहे, यामधील कुठली ६ नावं केंद्रीय नेतृत्वाकडून फायनल होणार, हे लवकरच कळेल. या निवडणुकीत जातीय आणि प्रादेशिक समतोलावर विशेष भर दिला जाणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभेतील ९ सदस्यांची मुदत १३ मे २०२६ रोजी संपणार आहे.

यामध्ये संजय केणेकर, नीलम गोऱ्हे, उद्धव ठाकरे, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड आणि शशिकांत शिंदे या ९ सदस्यांचा समावेश आहे. तर विधानपरिषद सदस्य डॉ. प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या विधानपरिषदेच्या एका जागेसाठी निवडणूक होणार आहे. या १० जागांसाठी पुढच्या महिन्यात १२ मे २०२६ रोजी मतदान होणार आहे. या दिवशी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान, तर सायंकाळी ५ वाजल्यानंतर मतमोजणी करण्यात येणार आहे.

# कळसूबाई, सांदण दरीसाठी उद्यापासून थेट बससेवा सुरू

## आठवड्यात दोन दिवस नियमित धावणार बस


छाया– विलास तुपे, राजूर



राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कळसूबाई आणि आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाची प्रसिद्ध सांदण दरी हे भाविकांचे व ट्रेकर्सचे मुख्य आकर्षण आहे. मात्र येथे जाण्यासाठी नाशिकहून थेट बससेवा नसल्याने पर्यटक, भाविक, गिर्यारोहक आणि नागरिकांची मागणी मान्य करीत एसटी महामंडळाने या मार्गावर येत्या शनिवार (दि. २५) पासून बससेवा सुरू केली आहे. दर शनिवारी आणि रविवारी, असे आठवड्यातून दोन दिवस आता या मार्गावरून नियमित बस धावेल.

एसटी महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, येथील नवीन बसस्थानकावरून (ठक्कर बाजार) दर शनिवारी दुपारी ३.१५ वाजता नाशिक ते साम्रद व साम्रदहून संध्याकाळी ६.१५ वाजता साम्रद ते नाशिक बस सुटेल. दर रविवारी या मार्गावर बसच्या दोन फेऱ्या धावतील. रविवारी सकाळी सहा आणि दुपारी ३.१५ वाजता नाशिक ते साम्रद बस धावेल. तसेच साम्रद येथून सकाळी आणि संध्याकाळी ६.१५ वाजता साम्रद ते नाशिक बस धावेल. या बससेवेमुळे कळसूबाई शिखरावर जाण्यासाठी पांजरे या पर्यायी मार्गाची सोयही गिर्यारोहकांसाठी उपलब्ध झाली आहे.

एसटी महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक विजय गिते, नाशिक विभाग नियंत्रक सचिन क्षीरसागर, विभागीय वाहतूक अधिकारी किरण भोसले, वाहतूक पर्यवेक्षक भास्कर ठाकूर आदिंच्या प्रयत्नांतून ही बससेवा सुरू झाली. 'सह्य मित्र फाऊंडेशन'चे संजय अमृतकर, रतन अंकोलेकर, दिलीप गिते, निलेश पवार, अभिजित अकोलकर यांनी यासाठी पाठपुरावा केला.

# राज्यात तब्बल ३० हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार?




मुंबई (प्रतिनिधी)-

महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात सध्या चिंतेचे वातावरण पसरले आहे. राज्यातील अनुदानित आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील तब्बल ३० हजार शिक्षकांच्या नोकरीवर टांगती तलवार असल्याचे बोललं जात आहे. अनुदानित आणि जिल्हा परिषद शाळांमधील हे शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कमी होत असलेली पटसंख्या आणि बदलणारे शैक्षणिक नियम यामुळे या शिक्षकांच्या भविष्यावर टांगती तलवार आली असून, शिक्षण वर्तुळात तीव्र पडसाद उमटत आहेत. राज्यात सध्या १ लाख ८ हजार ३५ शाळा असून, तिथे २ कोटींहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांसाठी साधारण ७ लाख ४६ हजार ३७७ शिक्षक कार्यरत आहेत. ही आकडेवारी मोठी वाटत असली, तरी सूक्ष्म स्तरावर चित्र वेगळे आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत झपाट्याने घट होत आहे. काही शाळांमध्ये केवळ १० ते १५ विद्यार्थीच उरले आहेत, तर तिथे शिक्षकांची संख्या मात्र मंजूर पदांनुसार जास्त आहे.

या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने १५ मार्च २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार (जीआर), ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या २० पेक्षा कमी आहे, अशा शाळांमधील शिक्षकांना अतिरिक्त ठरवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. नियमानुसार विद्यार्थी आणि शिक्षकांचे प्रमाण व्यस्त झाल्याने या शिक्षकांचे समायोजन दुसऱ्या शाळांमध्ये करावे लागणार आहे. या निर्णयामुळे शिक्षकांच्या नोकरीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना लांबच्या शाळांमध्ये बदली स्वीकारावी लागेल किंवा त्यांच्या सेवा ज्येष्ठतेवर याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः ग्रामीण भागात काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये यामुळे मोठी अस्वस्थता आहे.

शिक्षक संघटनांनी या धोरणात्मक निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. त्यांच्या मते, शाळांमधील पटसंख्या कमी होण्यामागे अनेक सामाजिक आणि भौगोलिक कारणे आहेत. केवळ शिक्षकांना अतिरिक्त ठरवून प्रश्न सुटणार नाही, तर सरकारने शाळांची गुणवत्ता वाढवून विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबवली पाहिजे, अशी मागणी संघटनांनी केली आहे. आता येत्या शैक्षणिक वर्षात या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन कसे केले जाते आणि सरकार शिक्षक संघटनांच्या मागणीवर काय तोडगा काढते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# सेन्सेक्स ६०० अंकांनी घसरला; आयटी शेअर्सवर विक्रीचा दबाव



मुंबई (प्रतिनिधी)-

शुक्रवार, २४ एप्रिल रोजी, सेन्सेक्स ६०० अंकांनी (०.८०%) घसरणीसह ७७,००० वर व्यवहार करत आहे. निफ्टीमध्येही १५० अंकांची (०.६०%) घसरण झाली असून, तो २४,००० च्या पातळीवर आला आहे. आजच्या व्यवहारात रिअल्टी क्षेत्रात सर्वाधिक खरेदी दिसून येत आहे, तर आयटी शेअर्समध्ये सर्वाधिक विक्रीचा दबाव आहे.

अमेरिका-इराणमधील वाढत्या तणावाचा परिणाम बाजारावर स्पष्टपणे दिसून येत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २२ एप्रिलची युद्धबंदीची अंतिम मुदत पुढे ढकलली असली, तरी तणाव अद्याप कायम आहे. अमेरिकेच्या नौदलाने इराणी बंदरांची नाकेबंदी सुरूच ठेवली आहे, तर इराणने 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुज'मध्ये दोन जहाजे ताब्यात घेतली आहेत.

दोन्ही देशांमधील चर्चेची मागील फेरी कोणत्याही ठोस करारावर पोहोचू शकली नाही. त्यानंतर पाकिस्तानात दुसऱ्या फेरीची चर्चा होईल, अशी अपेक्षा होती; मात्र आता गुंतवणूकदारांना अशा कोणत्याही चर्चेची विशेष अपेक्षा उरलेली नाही. या पार्श्वभूमीवर बाजारातील अनिश्चितता अधिक वाढली आहे.

कच्च्या तेलाच्या किमतींमध्येही मोठी वाढ झाली आहे. ब्रेंट क्रूड तेलाच्या किमती १०० डॉलर प्रति बॅरलच्या वर गेल्या आहेत. बाजारात तेलाची मजबूत मागणी आणि 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुज'बद्दलची वाढती चिंता यामुळे ही वाढ झाल्याचे मानले जात आहे. हॉर्मुज हा जागतिक तेल पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग मानला जातो.

दरम्यान, एक दिवसापूर्वी म्हणजेच २३ एप्रिल रोजीही बाजारात मोठी घसरण झाली होती. सेन्सेक्स ८५२ अंकांनी (१.०९%) घसरून ७७,६६४ वर बंद झाला होता, तर निफ्टी २०५ अंकांनी (०.८४%) घसरून २४,१७३ वर आला होता.

# पेट्रोल-डिझेल दरवाढीच्या बातम्या दिशाभूल करणाऱ्या!

## सरकारकडून स्पष्टता!

नवी दिल्ली(वृतसंस्था)-

पेट्रोल-डिझेल २८ महाग होण्याच्या बातम्या खोट्या असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. पेट्रोल-डिझेलच्या किमतीत २५-२८ प्रति लिटर वाढ झाल्याच्या बातम्या सरकारने चुकीच्या ठरवल्या आहेत. आज म्हणजेच २३ एप्रिल रोजी पेट्रोलियम मंत्रालयाने सांगितले की, दर वाढवण्याचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असून, भीती पसरवण्यासाठी पसरवल्या जात आहेत.

एक दिवसापूर्वी कोटक इन्स्टिट्यूशनल इक्विटीजने अहवालात अंदाज व्यक्त केला होता की, बंगाल आणि तामिळनाडू विधानसभा निवडणुका संपल्यानंतर पेट्रोल-डिझेल महाग होऊ शकते. हा अंदाज प्रति बॅरल सुमारे १२० डॉलर क्रूड ऑइलच्या किमतीवर आधारित होता.

सरकारी निवेदनात यावर भर देण्यात आला आहे की, भारत जगातील एकमेव असा मोठा देश आहे, जिथे गेल्या ४ वर्षांत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत वाढ झालेली नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतारांनंतरही भारतात घरगुती किमती स्थिर राहिल्या आहेत.

इंधन महाग होण्याचा परिणाम केवळ पेट्रोल पंपापुरता मर्यादित राहत नाही. जर दर वाढले, तर मालवाहतूक महाग होईल. यामुळे फळे, भाजीपाला आणि दैनंदिन वस्तूंचे दरही वाढतील. ऑटो क्षेत्र आणि ग्रामीण बाजारातील मागणीवरही याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

अमेरिका-इराणमधील तणावामुळे क्रूड ऑइलच्या किमती वाढल्या आहेत. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याचे मुख्य कारण अमेरिका-इराणमधील सध्याचा तणाव आहे. या तणावामुळे इराणने 'स्ट्रेट ऑफ होर्मुज' सारखा महत्त्वाचा तेल मार्ग बंद केला आहे. यामुळे पुरवठा कमी झाला आहे. मार्च आणि एप्रिलमध्ये भारताची कच्च्या तेलाची आयात १३-१५ टक्क्यांनी घटली आहे, तरीही आयात बिलात दररोज सुमारे १८०० ते २००० कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

# "माझे गाव, आरोग्य संपन्न गाव" अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबविणार - जिल्हा आरोग्य अधिकारी




अहिल्यानगर (जिल्हा माहिती अधिकारी)-

माझे गाव आरोग्य संपन्न गाव हा राज्यस्तरीय महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून, या अभियानामध्ये अहिल्यानगर जिल्हा सक्रिय सहभाग घेत आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी दिली.

या अभियानाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीमध्ये राज्यस्तरीय उद्घाटन नुकतेच पार पडले असून, कार्यक्रमाबाबत कार्यशाळाही संपन्न झाली आहे. या अभियानांतर्गत ग्रामस्तरावर आरोग्य निर्देशांक सुधारण्यासाठी विविध आरोग्य विषयांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून, त्यामध्ये संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे नियंत्रण, माता व बाल आरोग्य सेवा बळकटीकरण तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी यांचा समावेश आहे. संसर्गजन्य आजारांमध्ये कुष्ठरोग, क्षयरोग, जलजन्य आजार जसे की विषमज्वर, गॅस्ट्रो, अतिसार तसेच किटकजन्य आजार जसे की डेंग्यू व मलेरिया यांचे नियंत्रण करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच असंसर्गजन्य आजारांमध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब व कर्करोग या आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी उपाययोजना राबविण्यात येतील.

माता व बाल आरोग्य अंतर्गत प्रसूतिपूर्व व प्रसूतिपश्चात सेवा, लसीकरण, कुटुंब कल्याण, कुपोषण निर्मूलन तसेच अति जोखमीच्या मातांची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. याशिवाय शुद्ध पाणी पुरवठा, स्वच्छता राखणे, जैविक कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण व वृक्ष लागवड या प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर दिला जाणार आहे. अभियानांतर्गत ग्रामपंचायतींचे मूल्यमापन निश्चित निर्देशांकांच्या आधारे करण्यात येणार असून, एकूण १०० गुणांपैकी ७० पेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या ग्रामपंचायतींना आरोग्य संपन्न ग्राम म्हणून गौरविण्यात येणार आहे.

या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य, विभाग व जिल्हास्तरावर पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यामध्ये राज्यस्तरावर प्रथम क्रमांकाचे ५ कोटी रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात येणार असून, द्वितीय क्रमांकास ३ कोटी तर तृतीय क्रमांकास २ कोटी रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मान करण्यात येणार आहे. विभागस्तरावर प्रथम क्रमांकास १ कोटी, द्वितीय ७५ लक्ष तर तृतीय ५० लक्ष रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार असून, जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकास २५ लक्ष, द्वितीय २० लक्ष व तृतीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतीस १५ लक्ष रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आरोग्य संस्था (उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय), पंचायत समित्या व जिल्हा परिषदांनाही विविध स्तरांवर स्वतंत्रपणे गौरविण्यात येणार असून, त्यासाठीही पारितोषिकांची तरतूद करण्यात आलेली आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर सर्व विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी यांची बैठक घेण्यात आली असून, अभियानाची उद्दिष्टे, अंमलबजावणीची रूपरेषा तसेच विविध विभागांच्या समन्वयातून आरोग्य निर्देशांक सुधारण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांची कार्यशाळा आयोजित करून ग्रामपातळीवर आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेऊन अभियानाबाबत जनजागृती करावी व आवश्यक ठराव करून सदर अभियान यशस्वी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले आहे. जिल्हा परिषद प्रशासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे जिल्ह्यात आरोग्यदायी, स्वच्छ व सक्षम गावांची निर्मिती होण्यास निश्चितच मदत होईल, असेही डॉ. नागरगोजे यांनी कळविले आहे.

# हजारो फेरीवाल्यांना दिलासा, पीएम स्वनिधी योजनेला मुदतवाढ, कर्जमर्यादा वाढविली




मुंबई (प्रतिनिधी)-

नागरी भागातील हजारो फेरीवाल्यांसाठी दिलासादायक निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. कोरोना काळात आर्थिक अडचणीत सापडलेल्या फेरीवाल्यांना उभारी देण्यासाठी केंद्र सरकारच्या पंतप्रधान फेरीवाला आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेची पुनर्रचना करण्यात आली असून, तिला २०३० पर्यंत मुदतवाढही देण्यात आली आहे.

राज्यातील सर्व महापालिका, नगरपालिका, नगरपंचायतींमध्ये या योजनेची अंमलबजावणी सुरूच ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या योजनेअंतर्गत पथविक्रेत्यांना तारणमुक्त कर्ज तीन टप्प्यांत दिले जाणार आहे. पहिला टप्पा हा १५ हजार रुपयांपर्यंत कर्ज (१२ महिन्यांत परतफेड), दुसरा टप्पा २५ हजार रुपयांपर्यंत कर्ज (१८ महिन्यांत परतफेड), तर तिसरा टप्पा हा ५० हजार रुपयांपर्यंत कर्ज (३६ महिन्यांत परतफेड) असा असेल.

वेळेवर कर्जफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना पुढील टप्प्यातील कर्जासाठी पात्रता मिळणार असून, आगाऊ परतफेडीवर कोणताही दंड आकारला जाणार नाही.

नियमित कर्जफेड करणाऱ्या फेरीवाल्यांना ७ टक्के व्याज अनुदान दिले जाणार आहे. हे अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात तिमाही पद्धतीने जमा होईल. तसेच, कर्जासाठी पत हमी संरक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे, ज्यामुळे बँकांकडून कर्ज मिळणे अधिक सुलभ होईल.

दुसऱ्या टप्प्याचे कर्ज फेडल्यानंतर लाभार्थ्यांना यूपीआय संलग्न रुपे क्रेडिट कार्ड दिले जाईल. त्याची प्रारंभिक मर्यादा ही १० हजार रुपये, तर वाढीव मर्यादा ३० हजार रुपये इतकी असेल. ही सुविधा पाच वर्षांसाठी असेल.

डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन दिले जाईल. त्यात दरमहा १०० रुपयांपर्यंत कॅशबॅक असेल, वर्षाला २०० रुपयांपर्यंतचा, तर वर्षाकाठी १२०० रुपयांचा लाभ दिला जाईल.स्वनिधी से समृद्धी अंतर्गत फेरीवाल्यांना विविध शासकीय योजनांशी जोडले जाणार आहे. यामुळे सामाजिक सुरक्षा, आरोग्य, विमा आणि इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार आहे. फेरीवाल्यांसाठी उद्योजकता, डिजिटल साक्षरता, आर्थिक व्यवस्थापन यांसारख्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. अन्न विक्रेत्यांना स्वच्छता व अन्नसुरक्षा प्रशिक्षण दिले जाईल.

पॅनल
देणे आहे



दैनिक
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



पॅनल
देणे आहे






भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# समता पतसंस्थेचे संस्थापक काका कोयटे यांचा राजीनामा

## मी भोंदू खरातचा भक्त नाही - कोकाटे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरातची वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये सखोल चौकशी सुरू आहे. याआधी अनेक नेते आणि महत्त्वाच्या पदावरील व्यक्ती अशोक खरातच्या संपर्कात होते अशी माहिती समोर आलेली आहे. महिलांचे लैंगिक शोषण करण्यासह अशोक खरातने भोंदुगिरी आणि आर्थिक गैरव्यवहार केल्याचे समोर आले आहे. समता पतसंस्थेचे संस्थापक काका कोयटे यांनी राज्य पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून काका कोयटे फेडरेशनचे अध्यक्ष होते, मात्र काही दिवसांपूर्वी भोंदू अशोक खरात याचे समता पतसंस्थेशी कनेक्शन समोर आल्यानंतर सभासदांकडून राजीनाम्याची मागणी करण्यात आल्याची चर्चा समोर आली होती,



त्यानंतर आता त्यांनी आपले पद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य पतसंस्था फेडरेशच्या अंतर्गत राज्यातील १५ हजार पतसंस्था काम करतात. ६ हजार सभासद असलेल्या या फेडशनचे कोयटे २०१५ च्या पूर्वीपासून अध्यक्ष होते. मात्र काही दिवसांपूर्वी अशोक खरात आणि समता परिषदेचे संबंध असल्याचे समोर आले होते, त्यामुळे त्यांच्यावरील दबाव वाढला होता, त्यामुळेच आता काका कोयटे पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदावरून पायऊतार झाले आहेत.

समता पतसंस्थेत अशोक खरात तब्बल १०० खात्यांना नॉमिनी असल्याचे समोर आले होते, या खात्यांमधून कोट्यवधींचे व्यवहार झाल्याचे समोर आले होते. तसेच काका हे खरातचे भक्त असल्याचा आरोप झाला होता. त्यावेळी बोलताना काका कोयटे यांनी म्हटले होते की, मी भोंदू खरातचा भक्त नाही, कोणत्याही भोंदूशी माझा संबंध नाही. नाशिकच्या पतसंस्था फेडरेशनच्या कार्यक्रमात खरात होता एवढच. समता पतसंस्थेमध्ये भोंदू अशोक खरात नॉमीनी असलेल्या खात्यांची केवायसी करूनच ते उघडण्यात आले. जास्त खाती कोविड काळात ऑनलाईन उघडण्यात आली होती. जे खातेदार म्हणतायत आमचा संबंध नाही त्याचे पुरावे पोलिसांना देऊ असं स्पष्टीकरण काका कोयटे यांनी दिले आहे.

# गोदा ते नर्मदा जलयात्रा शनिवारी संगमनेरात

## महायुतीच्या वतीने स्वागताची जोरदार तयारी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जलसंपदा विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या गोदा ते नमर्दा जलयात्रेच्या स्वागताची जय्यत तयारी महायुतीच्या वतीने करण्यात आली असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी जिर्णोध्दार केलेल्या प्रभू श्रीरामांच्या मंदिरात महाआरती करून जलयात्रेतील स्वयंसेवक वारकरी वंदन करणार आहेत. जलयात्रेच्या स्वागताच्या निमिताने भक्ती आणि वारसा यांचा संगम पाहायला मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून या यात्रेचा शुभारंभ दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आणि अखिल भारतीय स्वामी समर्थ केंद्राचे प्रमुख आण्णासाहेब मोरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून होळकर घराण्याचे वंशज श्रीमंत युवराज यशवंत होळकर बहाद्दूर यांच्या उपस्थितीत यात्रेचा शुभारंभ झाल्यानंतर नासिक मार्गे जलयात्रेचे आगमन संगमनेर मध्ये होणार असल्याचे





आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून येणाऱ्या या जलयात्रेचे आगमन सायंकाळी ५ वाजता संगमनेर शहरामध्ये होणार असून, घुलेवाडी येथूनच या यात्रेचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. पुणे-नाशिक महामार्गावर ठिकठिकाणी यात्रेच्या स्वागतासाठी स्वागत कक्ष उभारण्यात येणार आहेत. महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी यात्रेच्या स्वागताची भव्य तयारी केली आहे. या संदर्भात झालेल्या बैठकीस आ.अमोल खताळ,भाजपाच्या अध्यक्षा सौ.पायल ताजणे,गुलाबराजे भोसले,राष्ट्रवादी काँग्रेसचे आबासाहेब थोरात शिवसेनेचे विनोद सूर्यवंशी विठ्ठलराव घोरपडे कैलास कासार रामभाऊ राहाणे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुक्यातील सर्व शेतकरी, वारकरी, महिला तसेच पाण्याच्या क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींनाही यासाठी निमंत्रित करण्यात येणार आहे.संगमनेर शहरातील पुरातन श्रीराम मंदिराचा जीर्णोद्धार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केलेला आहे त्यांच्या नावाने निघालेली यात्रा संगमनेरमध्ये येणे महत्वपूर्ण आहे. यात्रेच्या स्वागतासाठी काढण्यात येणारी शोभायात्रा चंद्रशेखर चौक येथील श्रीराम मंदिरापर्यंत जाणार असून, या ठिकाणी महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्य मार्गावरून यात्रा जाणार असल्याने स्वागत कमानी रांगोळी झेंड्याची सजावट तसेच यात्रेत सहभागी असलेल्या रथामधून जल व्यवस्थापन आणि संवर्धनाच्या संदर्भात प्रबोधनात्मक कार्यक्रम दाखवले जाणार आहेत.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जलक्षेत्रातील कामाची स्वतंत्र चित्रफीत आणि महायुती सरकारने दुष्काळमुक्त महाराष्ट्र करण्याच्या दृष्टीने घेतलेल्या निर्णयाची माहीती यात्रेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे.

अध्यात्मिक आणि पौराणिक वारसा असलेल्या गंगामाई घाटावर यात्रेचा मुक्काम असून दुसर्या दिवशी प्रवरामाईच्या जलपूजनाचा कार्यक्रम संपन्न होवून जलकलश यात्रेत सुपूर्त करण्यात येणार असल्याचे आ.खताळ म्हणाले.

राज्यातील तीस नद्यांमधील पाण्याचे विधिवत पूजन करून जलकलश शिर्डी येथे संकलित करण्यात येणार आहेत.शुक्रवारी सकाळी ९वाजता जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत श्रीक्षेत्र जोर्वे येथे जलपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.


INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


# संगमनेर महसूल कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

## तहसीलदारांच्या संघटनेचा आंदोलनास पाठिंबा


संगमनेर (प्रतिनिधी)- सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तत्काळ जारी करावी. १० वर्षे सतत काम करीत असलेल्या सर्व कंत्राटी, रोजंदारी, अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित कराव्यात. शिक्षकांचे जीवन उध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन आदेशाबाबत पुनर्विचार करण्यात यावा, आदी मागण्या सरकारी निम्नसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने केल्या असून बुधवारपासून (दि.२२) संगमनेरातील मंडलाधिकारी, तलाठी, महसूल कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनास तहसीलदार व नायब तहसीलदार यांच्या संघटनेने पाठिंबा दर्शविला आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात १ मार्च २०२४ ला घोषित केल्याप्रमाणे सुधारित निवृत्तीवेतन योजनेची अधिसूचना महासंघाने सूचविलेल्या बाबींचा समावेश करून तातडीने जारी करावी. सेवानिवृत्तीचे वय हे केंद्र व अन्य २५ राज्यांप्रमाणे ६० वर्ष करावे. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर असलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच वस्तीशाळा शिक्षकांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करावी. चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी तत्काळ उठवा. १०, २०, ३० वर्षांच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा. राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचा २००५ पासून आकृतीबंध तयार करण्यात यावा. पूर्वाश्रमीच्या ग्रामपंचायतींमधील कायम असलेल्या कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन करण्यात यावे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा पुनर्विचार कराव करावा, आदी मागण्या सरकारी-निम्नसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर, कर्मचारी समन्वय समितीने केल्या आहेत.


चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२



अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13








स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25